सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०१७–१८/९२६ **सुधारित पत्र** दिनांक : १३/०६/२०१८

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व
महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय : विद्यार्थी विकास मंडळ प्राधिकरणांतर्गत जिल्हा समन्वयक पदाकरिता इच्छुकांची माहिती पाठवण्याची मुदतवाढ.**

संदर्भ क्र. : या विभागाचे पत्र क्र.विविमं/२०१७–१८/९१२, दि. ११/०६/२०१८

महोदय/महोदया,

उपरोक्त सदंर्भीय विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ५५ (२)(छ) नुसार मा. व्यवस्थापन परिषदेने प्रत्येक जिल्हासाठी सांस्कृतिक व विद्यार्थी कल्याण कार्यक्रमांचे जिल्हासमन्वयक नामनिर्देशन करणे गरजेचे आहे. त्यानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित पुणे, अहमदनगर व नाशिक अशा तीन जिल्हयांच्या कामाकाजात सुसूत्रीकरण्याच्यादृष्टीने पुणे शहर, पुणे ग्रामीण, अहमदनगर व नाशिक अशा चार विभागात जिल्हा समन्वयकाची मा. कुलगुरू यांच्याकडून नामनिर्देशन करण्यात येणार आहे. याबाबत दि. १३ जून, २०१८ पर्यंत माहिती मागवण्यात आली होती, त्यास खालील तपशील व मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर माहिती पाठविण्याची मुदत वाढविण्यात येत असून आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेतील जिल्हा समन्वयक पदाकरिता इच्छुकांची माहिती खाली दिलेल्या पात्रतेनुसार

१. मान्यताप्राप्त शिक्षक म्हणून किमान १० वर्षांचा अध्यापनाचा अनुभव.
२. सांस्कृतिक व विद्यार्थी कल्याण कार्यक्रमांमध्ये सक्रीय सहभाग असलेला विद्यार्थी विकास अधिकारी म्हणून किमान ३ वर्षांचा अनुभव.
३. विद्यार्थ्यांचे विविध सांस्कृतिक कार्यक्रम किंवा राष्ट्रीय छात्र सेवा कार्यक्रमांमध्ये सक्रीय सहभाग असल्याचा किमान ३ वर्षांचा अनुभव.

सदर माहिती आपल्यामार्फत **bsd@unipune.ac.in या मेलवर किंवा स्वहस्ते विद्यार्थी विकास मंडळ कार्यालयाकडे दिनांक १५ जून, २०१८** पर्यंत पाठविण्यात यावी. कळावे, ही विनंती.

संचालक (अतिरिक्त कार्यभार),
विद्यार्थी विकास मंडळ